महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे-४११००५

**परिपत्रक क्रमांक** : पुविमं/शाखा-पी-२/दिनांक : १४ जून२०१६ /५०३

## परीक्षा प्राधान्य/महत्वाचे

**विषय** – उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) जून-जुलै २०१६ **OUT OF TURN"**
प्रात्यक्षिक परीक्षेबाबत. . . .

. या परिपत्रकान्वये सर्व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, जून-जुलै २०१६ मध्ये होणा-या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेच्या शास्त्र विषयांतर्गत विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक **२७ जून २०१६ ते ०८ जुलै २०१६** या कालावधीत आयोजित केल्या आहेत. हे आपणास विदीतच आहे.

तथापि ज्या विदयार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा वर नमूद केलेल्या दिनांकास काही अपरिहार्य कारणामुळे होऊ शकली नाही अशा विदयार्थ्यांची "OUT OF TURN" प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक **३० जुलै २०१६** रोजी खालील जिल्हयातील कनिष्ठ महाविदयालयात घेण्यात येणार आहे.

| अ.क्र | जिल्हा | कनिष्ठ महाविदयालयाचे नाव व क्रमांक |
|---|---|---|
| १. | पुणे | लक्ष्मणराव आपटे विदयालय अ‍ॅण्ड ज्युनियर कॉलेज, आपटे रोड, पुणे (जे.११.११.०१२) फोन नं. ०२०/२५५३२८३७ |
| २. | अहमदनगर | डॉ. बी. पी हिवळे एज्युकेशन सोसायटीज ज्युनियर कॉलेज स्टेशन रोड, जि-अहमदनगर ४१४००१ (जे.-१२.०५.००१) फोन नं. ०२४१/२३५१६७१ |
| ३. | सोलापूर | संगमेश्वर कॉलेज ज्युनियर कॉलेज सेक्शन सात रस्ता, सोलापूर.४१३००१ (जे.१४.०१.००१) फोन नं.०२१७/२३१५५८८ |

तरी आपल्या कनिष्ठ महाविदयालयातील एखादा विदयार्थी मंडळाने निर्धारित केलेल्या वेळापत्रकानुसार प्रात्यक्षिक परीक्षेस उपस्थित राहू शकला नाही, तर त्याची "OUT OF TURN" ने प्रात्यक्षिक परीक्षा घेण्याची तरतूद आहे. अशा विदयार्थ्यांची माहिती बैठक क्रमांकासह उपरोक्त संबंधित कनिष्ठ महाविदयालयास कळवावी व विदयार्थ्यांना योग्य ठिकाणी प्रात्यक्षिक परीक्षा देण्यासाठी सूचना दयाव्यात. तसेच अशा विदयार्थ्यांची माहिती बैठक क्रमांक व अतिरिक्त शुल्क चलनाव्दारे भरुन उपरोक्त केंद्रावर जमा करण्यात यावे याबाबत मंडळास सहकार्य करावे. अतिरिक्त शुल्क पुढीलप्रमाणे :

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ. १२ वी)
प्रत्येक विषयासाठी प्रतिविदयार्थी रु.१००/-

उपरोक्त निर्धारित कालावधीनंतर कोणत्याही विदयार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा घेतली जाणार नाही, तसेच "OUT OF TURN" परीक्षाही केवळ वर निर्धारित केलेल्या केंद्रावरच होईल अन्य कोठेही घेतली जाणार नाही याची सर्व संबधित विदयार्थ्यांना जाणीव करुन दयावी व कोणताही विदयार्थी प्रात्यक्षिक परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. सदरचे "OUT OF TURN" च्या परीक्षेचे साहित्य परीक्षेनंतर मंडळ कार्यालयात दिनांक **०१ ऑगस्ट २०१६** रोजी समक्ष सादर करावे.

विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११ ००५

दिनांक : १४/०६/२०१६

प्रति,

१. पुणे विभागीय मंडळ कक्षेतील सर्व कनिष्ठ महाविदयालय प्रमुख यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.
२. शिक्षणाधिकारी (माध्य.), पुणे/अहमदनगर/सोलापूर
३. सचिव राज्य मंडळ पुणे-४११००५ यांना माहितीस्तव.

प्राचार्य,

१. लक्ष्मणराव आपटे विदयालय अ‍ॅण्ड ज्युनियर कॉलेज, आपटे रोड, पुणे.
२. डॉ. बी. पी हिवळे एज्युकेशन सोसायटीज ज्युनियर कॉलेज स्टेशन रोड, जि-अहमदनगर.
३. संगमेश्वर कॉलेज ज्युनियर कॉलेज सेक्शन सात रस्ता, सोलापूर.४१३००१